| | | |
|---|---|---|
| | # पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय | |

**प्रेस नोट** दि.०२/०८/२०२४

## जीवघेणा हल्ला करुन फरार झालेल्या कुख्यात गुंडास व त्याच्या साथीदारांनाएम.आय.डी.सी भोसरी पोलीसांनी केले जेरबंद

---

एम.आय.डी.सी भोसरी पोलीस स्टेशन हददीत दिनांक २०/०६/२०२४ रोजी रात्रौ २२/१० वा. चे सुमारास मातोश्री बिल्डींग समोर, सेक्टर १२ एम.आय.डी.सी भोसरी, पुणे येथेफैज फहिम शेख.रा.जाधववाडी, चिखली. व त्याचा मित्र विशाल गौतम.रा. खंडेवस्ती, एमआयडीसी भोसरी पुणे.हे त्यांचे मोटर सायकलवरुन घरी जात असताना त्यांचे मोटर सायकलला यातील आरोपी अर्थव उदय पकाले,रा. पी.एम.आ.डी.ए वसाहत, सेक्टर १२, यानेत्याचे दोन साथीदारासह मोटारसायकल वरुन येवुन त्याची मोटारसायकल फैज शेख याचे मोटारसायकलला आडवी लावुन त्यांना थांबवले त्यावेळी मोटारसायकल वरुन आलेल्या सुरज रणदिवे रा. घरकुल, चिखली, पुणे याचेसोबतचे दोन अनोळखी इसम व तिस-या मोटारसायकल वरुन आलेल्या सोन्याऊर्फ विवेक विनोद नाईक त्याचे सोबत आलेल्या दोन अनोळखी इसमांनी येवुन त्यातील अथर्व पकाले याने फैज शेख यास तु मला सारखे पैसे मागुन त्रास देतो काय असे म्हणुन थांब आता तुला जिवंत सोडत नाही तुला ठार मारतो असे म्हणुन त्याचे हातातील लोखंडी रॉडने त्याचे डोक्यात ठिकठिकाणी जोराचा घाव घावुन गंभीर जखमी करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्याचा मित्र सुरज रणदिवे, रा घरकुल, चिखली, पुणे, सोन्याऊर्फ विवेक विनोद नाईक यांनी ही फैज शेख याच्या डोक्यास रॉडने मारुन गंभीर जखमी केले.व त्यांचे इतर साथीदारांनी जुने वादाच्या कारणावरुन त्यास लाथाबुक्यानी मारहाण करुन त्याचा मित्र विशाल गौतम यालाशिवीगाळ वमारहाण करुन जखमी केले. वगैरे मजकुर वरुन गुन्हा दाखल असुन सदर गुन्ह्यात यापुर्वी **१)विवेक विनोद नाईक ऊर्फ सोन्या, वय २० वर्षे, रा. सेक्टर १२, खंडेवस्ती, भोसरी, पुणे.२) सौरभ कानिफनाथ भोपले,वय २० वर्षे, रा. सेक्टर १२, खंडेवस्ती, भोसरी, पुणे.**यांना सदर गुन्ह्यात यापुर्वी अटक करण्यात आली असुन एका विधीसंघर्षित बालकास तात्काळ ताब्यात घेण्यात आले होते.

परंतु सदर गुन्ह्यातील मुख्य आरोपी **१)सुरज प्रकाश रणदिवे.वय-३० वर्षे. रा. घरकुल,चिखली पुणे.२) अर्थव उदय पकाले, वय २० वर्षे, रा. पी.एम.आ.डी.ए. वसाहत, सेक्टर १२, एमआयडीसी भोसरी पुणे.**हे गुन्हा घडल्यापासुन अद्याप पर्यंत फरारी होते.ते पोलीसांना गुंगारा देऊन वेगवेगळ्या ठिकाणी वास्तव्य करत होते.त्यांचा कसोशीने तपास करुन तांत्रिक विश्लेषनाद्वारे मिळालेल्या माहीतीनुसार त्यांचा शोध घेवुन त्यांना सदर गुन्ह्यात दि.३१/०७/२०२४ रोजी अटक करण्यात आली असुन त्यांचे इतर फरारी साथीदार नामे **३) प्रतीक ज्ञानेश्वर सपकाळ. वय-२८ वर्षे. रा. वाकड पुणे. ४) चेप्या उर्फ केतन गौतम सोनवणे. वय- २६ वर्षे. रा. मिलींदनगर पिंपरी पुणे. ५) लकी उर्फ लखन उर्फ सुनिल रामभाऊ पवार वय- २४ वर्षे. रा. काळाखडक झोपडपट्टी, वाकड,पुणे.** यांना दि.

०१/०८/२०२४ रोजी अटक करण्यात आली असुन सदर गुन्ह्यात एकुन ०८ आरोपी यांना अटक करण्यात आली असुन गुन्ह्यात वापरलेल्या एकुन ०३ मोटर सायकल जप्त करण्यात आल्या आहेत.सदरचे आरोपी सध्या पोलीस कस्टडीमध्ये आहेत.

**यातील आरोपी नामे सुरज प्रकाश रणदिवे.वय-३०वर्षे.रा.घरकुल,चिखली पुणे. हा कुख्यात गुन्हेगार असुन त्याचेवर यापुर्वी पिंपरी चिंचवड आयुक्तालय व पुणे ग्रामिण हद्दीत खालील प्रमाणे गंभीर गुन्हे दाखल आहेत.**

**१)खेड पोलीस स्टेशन पुणे.(ग्रा)गु.र.नं.३०६/२०२० भा.दं.वि.कलम ३०२,१२०(ब),१४१,१४३**

**२)चिंचवड पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. ८१/२०२३ भा.दं. वि. कलम ३०२,३४**

**३)निगडी पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. ५३०/२०१८ भा.दं.वि. कलम ३२६,३२४, ३२३,५०४,३४, आर्म ॲक्ट ४(२५),२७.**

सदरची कारवाई ही **मा.पोलीस आयुक्त, श्री. विनयकुमार चौबे सो., मा.सह.पोलीस आयुक्त श्री. शशिकांत महावरकर सो.,मा.अप्पर पोलीस आयुक्त श्री.वसंत परदेशी सो., मा.पोलीस उपायुक्त श्री.डॉ.शिवाजी पवार सो. परि-०३, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त श्री.सचिन हिरे सो. एमआयडीसी भोसरी विभाग, एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.गणेश जामदार यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकातील पोलीस उप-निरीक्षक राजेंद्र पानसरे, पोलीस अंमलदार चंद्रकांत गवारी, शरद गांधिले, राजू जाधव, संजय जरे, स्वप्निल शेलार, गणेश बो-हाडे, राहूल लोखंडे, जीवन बिराजदार, प्रविण मुळुक, नितिन खेसे, विशाल काळे, भागवत शेप, आनंद जाधव, अक्षय क्षीरसागर, अनिकेत कांबळे**यांनी केली आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास एम.आय.डी.सी भोसरी पोलीस स्टेशनचे **सहा.पोलीस निरीक्षक किरण पठारे** हे करीत आहेत.

**(डॉ.शिवाजी पवार)**
**पोलीस उप आयुक्त**
**परिमंडळ-३, पिंपरी चिंचवड**